**ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई-परिस्थिती निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत करावयाची कार्यवाही.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:टंचाई-१०९९/प्र.क्र. १२ / पापु-१४**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक ३ फेब्रुवारी, १९९९.**

**संदर्भ :-** शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक टंचाई-१०९४/प्र.क्र.८५/४३ दिनांक:- ८.४.१९९४.

**प्रस्तावना :-**

राज्यातील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याच्या कामास गती देण्याच्या दृष्टीने "पाणी पुरवठा व स्वच्छता" या स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली आहे. दरवर्षी अपु-या पर्जन्यामुळे किंवा अन्य कारणांमुळे, राज्यात ग्रामीण क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास, त्याबाबत करावयाच्या उपाययोजना वर संदर्भात नमूद केलेल्या ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या शासन निर्णयानुसार घेण्यात येतात. पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत कोणताही संभ्रम निर्माण होऊ नये म्हणून या विभागाकडून स्वतंत्र सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

वर प्रस्तावनेत स्पष्ट केल्याप्रमाणे ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ करावयाच्या कार्यवाहीबाबत संदर्भात नमूद केलेले अधिक्रमित करुन शासन आता खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**(I)** प्रत्येक जिल्हयात दर वर्षी पावसाळा संपल्यानंतर जिल्हयाच्या वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी त्यांच्या सहाय्यक भूवैज्ञानिकांच्या मदतीने खालील बाबींचा अभ्यास करुन पुढील उन्हाळयात जिल्हयातील पाणी टंचाई भासण्याची शक्यता असणा-या गावांची/वाडयांची तालुकानिहाय यादी तयार करावी.

१) संबधित भागातील सरासरी वार्षिक पर्जन्यमान
२) चालू पावसाळयात पर्जन्यमानातील फरक.
३) संबधित भागातील निरिक्षण विहिरींच्या माहितीवरुन भूजलाच्या पातळीमध्ये आढळलेला फरक.
४) संबधित गावांच्या/वाडयांच्या १.५ कि.मी.च्या परिसरातील सार्वजनिक उद्भवातून दरडोई दरदिवशी २० लिटर्सपेक्षा कमी पाणी उपलब्ध होण्याची शक्यता

सदरहू यादी तयार करतांना संबधित गावांत/वाडयांत उपलब्ध असलेली पाणी पुरवठा सर्व साधने व त्यांची सद्यस्थिती याबाबतची तपशीलवार माहिती सोबतच्या प्रपत्र (अ) व (ब) मध्ये भरण्यात यावी. सदरची यादी व माहिती तयार केल्यानंतर ती संबधित तहसिलदार व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या संयुक्त अहवालासह जिल्हाधिका-याकडे पाठवावी. जिल्हाधिका-यांनी त्यावर खालील वर्गीकरणाप्रमाणे कार्यवाही करावी -

(अ) ज्या गावांत/वाडयांत जिवंत उद्भव असलेली सार्वजनिक पाणी पुरवठयाची साधने आहेत व सहाय्यक भूवैज्ञानिकांच्या अहवालानुसार चालू वर्षाच्या उर्वरित काळात किंवा पुढील उन्हाळयात सदर सार्वजनिक



३११

उद्‌भवातील पिण्याच्या पाण्याच्या प्रमाणावर विपरित परिणाम होण्याची व पर्यायाने पाण्याची टंचाई भासण्याची शक्यता आहे. तेथे जिल्हाधिका-यांनी महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियम, १९९३ च्या कलम ४ अन्वये पिण्याच्या पाण्याची टंचाई जाहीर करण्याबाबत विचार करावा. ज्या गावांत/वाडयांत वरिलप्रमाणे पिण्याच्या पाण्याची टंचाई जाहीर करण्यात येईल अशा ठिकाणी जिल्हाधिका-यांनी सर्वप्रथम सार्वजनिक उद्‌भवातील पाण्यावर संभाव्य दुष्परिणाम थांबविण्याच्या दृष्टाने सदर अधिनियमातील कलम ५ अंतर्गत, प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी. ही उपयायोजना करुनही संबंधित गावांत/वाडयात पाण्याची टंचाई भासल्यास, म्हणजेच दरडोई दरदिवशी पिण्याच्या पाण्याची उपलब्धता २० लिटर्स पेक्षा कमी झाल्यास, जिल्हाधिकारी यांना या शासन निर्णयातील पुढील सूचनांप्रमणे तेथे उपयुक्त टंचाई निवारक उपाययोजना घेण्याचे अधिकार राहतील.

(ब) ज्या गावांत/वाडयांत सद्यस्थितीत कोणतेही पाणी पुरवठयाचे उद्‌भव नाहीत किंवा अस्तित्वात असलेला उद्‌भव जैविक/रासायनिकदृष्टया प्रदुषित झाला आहे. अशी गावे राजीव गांधी पेयजल अभियानांतर्गत सर्वेक्षणात " सार्वजनिक उद्‌भव नसलेल्या गावांच्या/वाडयांच्या संवर्गात " किंवा " जैविक/रासायनिकदृष्टया प्रदुषित पाणी पुरवठा होत असलेल्या गावांच्या/वाडयांच्या संवर्गात " देखील मोडतील, अशी अपेक्षा आहे. अशा गावे/वाडया प्रचलित आदेशानुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत सर्वोच्च अग्रक्रमाने योजनांतर्गत तरतुदीतून उपयुक्त नियमित पाणी पुरवठा योजना घेण्यास पात्र असतात. अशा गावांचा/वाडयांचा समावेश टंचाईच्या गावांच्या/वाडयांच्या यादीत असल्यास तेथे पाणी टंचाई सुरु होण्यापूर्वीच नियमित ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाखालील योजनांतर्गत तरतुदीतून निधीच्या उपलब्धतेनूसार साधी विहिर, विंधण विहिरी किंवा नळ पाणी पुरवठा योजना यापैकी किमान खर्चाची योजना सर्वोच्च अग्रक्रमाने राबविण्यासाठी प्रयत्न करावेत. तसे शक्य नसल्यास अशा गावांत/वाडयांत पुढील सूचनांना अनुसरुन तातडीच्या आणि उपयुक्त टंचाई निवारक उपाययोजना घेण्यास जिल्हाधिका-यांना मुभा राहिल.

**(II)** वरिलप्रमाणे पाणी टंचाई भासण्याची शक्यता असणा-या गावे/वाडया निश्चित झाल्यानंतर एकंदरीत सदर पाणी टंचाई ज्या कालावधीत भासणार आहे. त्या संपूर्ण कालावधीसाठी पिण्याच्या पाण्याची टंचाई निवारण करण्याकरिता आपल्या जिल्हयाचे टंचाई कृती आराखडे संबंधित जिल्हाधिका-यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्याशी विचारविनिमय करुन या शासन निर्णयातील पुढील सूचनांना अनुसरुन(१) ऑक्टोबर ते डिसेंबर (२) जानेवारी ते मार्च आणि (३)एप्रिल ते जून, अशा तीन स्वतंत्र भागात तयार करावेत व अराखडयातील घ्यावयाच्या कामांकरीता आवश्यक अनुदानाचे नियोजन आर्थिक वर्षनिहाय करण्यात यावे. संबंधित टंचाईग्रस्त गावे/वाडयांसाठी टंचाई निवारणाकरीता खालील अनुज्ञेय उपाययोजनांपैकी योग्य त्या उपाययोजनांची निवड करण्याची कार्यवाही वरिल तीनही अधिका-यांशी विचारविनिमय करुन प्रपत्र (अ) व (ब) मधील माहितीचा विचार करुन करण्याची आहे:-

१) बुडक्या घेणे.
२) विहिरी खोल करणे/विहिरीतील गाळ काढणे.
३) खाजगी विहिरींचे अधिग्रहण करणे.
४) टँकर/ बैलगाडीद्वारे पाणीपुरवठा करणे
५) प्रगतीपथावरील पाणीपुरवठा योजनाची कामे तातडीने पूर्ण करणे.
६) नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे.
७) विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करणे.
८) विंधण विहिरी घेणे.
९) तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे.

पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणासाठी करावयाच्या तातडीच्या उपाययोजना ठरवितांना त्यासाठी होणारा खर्च त्याचा भविष्यात होणारा फायदा, तसेच त्या उपाययोजना कार्यान्वित करण्यासाठी लागणारा वेळ या बाबींचा प्रामुख्याने विचार करण्यात यावा. टंचाई निवारण उपाययोजनेची निवड करतांना ती उपलब्ध माहिती, तोंड द्यावयाचा एकूण टंचाई कालावधी व स्थानिक परिस्थितीचा विचार करत, किमान खर्चाची असावी याची दक्षता घेण्यात यावी. याप्रमाणे तयार केलेल्या टंचाई कृती आराखडयाच्या कार्यान्वयनाचे सनियंत्रण जिल्हाधिका-यांकडे राहील.

**(III)** वरिल परिच्छेद क्रमांक (II) मध्ये नमूद केलेल्या टंचाई निवारण उपाययोजनांपैकी प्रथम चार आकस्मिक उपाययोजना म्हणजे टँकर/बैलगाडीद्वारे पाणी पुरवठा करणे, बूडक्या घेणे, विहिरी खोल करणे/गाळ काढणे खाजगी विहिरींचे अधिग्रहण करणे याबाबत या विभागाच्या शासन निर्णय क्रमांक:टंचाई-३०९९/प्र.क्र.१३/पापु-१४ दिनांक ०१.०२.९९ अन्वये निर्गमित केलेल्या स्वतंत्र आदेश प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

क्रमांक ५ ते ९ येथील उपाययोजनाबाबत शासन खालीलप्रमाणे स्थायी आदेश देतआहे. :-

**(१) <u>प्रगतीपथावरील पाणी पुरवठा योजना गतिमान करुन पाणी पुरवठा सुरु करणे:-</u>**

पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेल्या अथवा संभाव्य असलेल्या गावांत/वाडयात पूर्वी हाती घेण्यात आलेली नळ योजनांची/साध्या विहिरींची कामे प्रगतीपथावर असल्यास, ती कामे संबधित कार्यक्रमांतर्गत मंजूर निधीचा सर्वोच्च प्राधान्याने विनियोग करुन गतिमान करुन अशा योजना लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात याव्यात जेणेकरुन, ग्रामीण जनतेस त्यातून पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देता येईल व पाणी टंचाईवर मात करता येईल. शासन या संदर्भात असे आदेश देत आहे की, उपलब्ध योजनांतर्गत तरतूदींचा सर्वोच्च प्राधान्याने विनियोग संभाव्य टंचाईच्या गावातील/गाडयांतील प्रगतीपथावरील पाणी पुरवठा योजनांवर करण्यात यावा जेणेकरुन, उपलब्ध योजने अंतर्गत निधीचा अधिकाधिक उपयोग टंचाईवर मात करण्याच्या दृष्टीने होऊ शकेल.

**(२) <u>नळ पाणीपुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती करणे :-</u>**

(i) नळ योजनांच्या विशेष दुरुस्ती या सदरी नळ योजनांतील पंपिंग मशिनरी फार जुनी झाल्यामुळे नविन पंपिंग मशिनरी बसविणे, जुने झालेले पाईप बदलणे, पाणी साठवण टाकीची मोठी गळती दुरुस्त करणे, उन्हाळयात उद्‌भवाचे पाणी कमी झाल्यास, उद्‌भवाची खोली वाढविणे/इनवेल (उभे/आडवे) बोअर करुन उद्‌भवातील पाण्याचे प्रमाण वाढविणे, नळ कोंडाळयांची दुरुस्ती करणे इ. कामे मोडतील.

(ii) शासनाने शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक:ग्रापापु- १०९३/सीआर-८३१/३९-अ, दिनांक ११ जानेवारी १९९४ अन्वये जिल्हयातील सर्व पुर्ण व क्रियान्वित पाणी पुरवठा साधनांचे नियमित सर्वेक्षण करण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत. सदर सर्वेक्षण दरवर्षी सर्वसाधारणपणे ऑक्टोबर महिन्यात करावयाचे असून सदर सर्वेक्षणातील माहितीच्या आधारावर तसेच प्रपत्र (अ) व (ब) मधील माहितीचा विचार करता टंचाई कृती आराखडयात समाविष्ट कोणकोणत्या गावांत/वाडयात अस्तित्वात असलेल्या नळ योजनांची दुरुस्ती करुन पाणी पुरवठा चालू करुन संभाव्य टंचाईस तोंड देता येईल हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याशी विचारविनिमय करुन ठरवावे.

(iii) त्यानंतर ज्या गावांत/वाडयात नळ योजनांची विशेष दुरुस्ती करुन संभाव्य टंचाईस तोंड देण्याचे प्रस्तावित असेल अशा गावांत/वाडयात सदरील विशेष दुरुस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतुन घेता येईल किंवा कसे हे प्रथम पडताळून पहाण्यात यावे. जी कामे हाती घेण्यासाठी जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीत रक्कम उपलब्ध असेल ती कामे शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण

विभाग क्रमांक:ग्रापापु-१०९३/सीआर-६११/३९-अ, दिनांक १८ऑक्टोबर, १९९३ च्या परिशिष्ट (६) मधील सुचनांनुसार जिल्हा परिषदे अंतर्गत सक्षम प्राधिका-यांच्या मंजूरीने जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून घ्यावीत. जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून जेवढया नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे शक्य आहे, याचे नियोजन वरिलप्रमाणे केल्यानंतर टंचाई कृती आराखडयातील इतर नळ योजनांची विशेष दुरुस्ती याबाबतचे प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे सोबतच्या प्रपत्र (क) मध्ये दाखविलेल्या प्रमाणपत्रासह प्रशासकिय मंजूरीसाठी पाठवावेत. जिल्हाधिका-यांनी सदर कामे जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतुन घेणे शक्य नाही याची खात्री पटवून घेतल्यानंतर अशा दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान करावी. अथवा प्रस्ताव मान्यतेसाठी विभागीय आयुक्तांना सादर करावेत:-

(अ) रु. ५ लाख खर्चापर्यंतच्या विशेष दुरुस्त्या :- जिल्हाधिकारी.

(ब) रु. ५ लाखापेक्षा अधिक किंमतीच्या विशेष दुरुस्त्या (अमर्यादित)- विभागीय आयुक्त.

(iv) नळ योजनांच्या विशेष दुरुस्तींचे प्रस्ताव मंजूर करतांना प्रस्तावासोबत खालील मुद्यांची पूर्तता झालेली आहेत किंवा कसे याकडे संबधितांनी कटाक्षाने लक्ष दयावे:-

(अ) संबधित उप अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग यांनी स्वतः निरिक्षण करुन द्यावयाचा साईट निरिक्षण अहवाल.

(ब) विशेष दुरुस्तीची सविस्तर अंदाजपत्रके (विशेष दुरुस्तीवरील प्रस्तावित खर्च वाजवी आहे किंवा कसे याबाबतची खात्री अदांजपत्रकाची पडताळणी करुन करणे आवश्यक आहे.)

(क) विशेष दुरुस्ती कोणत्या परिस्थितीमुळे उद्‌भवली त्याची कारणमिमांसा उदा. योजनेच्या कामांच्या अंमलबजावणीमध्ये उणीवा होत्या किंवा कसे, योजनेच्या व्यवस्थापनेत हलगर्जीपणा इत्यादी.

(ड) जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून सदर विशेष दुरुस्तीचा खर्च करता येईल किंवा कसे याबाबत सदर निधीतील शिल्लक रकमेच्या तपशिलासह सुस्पष्ट अभिप्राय (जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतुन विशेष दुरुस्तीचे काम हाती घेणे शक्य नसल्यास याबाबतची कारणमिमांसा व प्रपत्र (क) मध्ये दर्शविल्यानुसार प्रमाणपत्र).

(v) नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीची कामे हाताळण्याची कार्यपध्दती सोबतच्या **प्रपत्र (ड)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

(vi) ज्या नळ योजनांच्या विशेष दुरुस्त्या जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून करणे शक्य नाही अशा विशेष दुरुस्तीच्या कामावरील संभाव्य खर्चाचा संबधित जिल्हाधिका-यांनी आढावा घेऊन आवश्यक निधीबाबतची यंत्रणावार मागणी सोबतच्या **निधी मागणी प्रपत्र-I** मध्ये शासनाकडे सत्वर पाठवावी. विशेष दुरुस्ती अभावी पाणी टंचाईस तोंड देण्यासाठी इतर महाग उपाययोजना घ्याव्या लागणार नाहीत हे कटाक्षाने पहाण्यात यावे.

**(३) विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती :-**

(i) विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती या संज्ञेमध्ये ज्या बाबींचा समावेश होतो. त्यात पाईप लाईन बदलणे, पाईप वाढविणे, गाळ काढणे(फ्लशिंग), तुटलेले प्लॅटफॉर्म दुरुस्त करणे, विद्युत पंप बदलणे/दुरुस्ती करणे या सर्व बाबींचा समावेश होतो.

(ii) ज्या गावांत/ वाडयात विंधण विहिरी अशा मोठया दुरुस्तीअभावी बंद पडल्यामुळे टंचाई भासत असेल आणि त्यांची विशेष दुरुस्ती केल्यास, संबंधित गावांत/वाडयांत सुरळितपणे पाणी पुरवठा करणे

शक्य असेल अशा विंधण विहिरींची विशेष दुरुस्तीची कामे जिल्हापरिषदेच्या देखभाल व दुरुस्ती पथकाकडून उप अभियंता (यांत्रिकी), भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जिल्हा परिषद यांच्या मार्गदर्शनाखाली विनाविलंब करुन घेण्यात यावी.

(iii) विंधण विहिरींची विशेष दुरुस्तीवरील खर्च प्रथम जिल्हा परिषदांनी त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नाच्या अंदाजपत्रकातील त्रिस्तरिय योजनेअंतर्गत विंधण विहिरीच्या विशेष दुरुस्तीसाठी नियमितपणे केलेल्या तरतुदीतून करावा. सदर निधी अपुरा पडल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी विंधण विहिरीच्या विशेष दुरुस्तीसाठी जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून खर्च करावा. त्या उपरही निधी आवश्यक असल्यास, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडून जिल्हाधिका-यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या योजनेतर तरतुदीवर आवश्यकतेनुसार निधी अशा विंधण विहिरींची विशेष दुरुस्तीसाठी उपलब्ध करुन देण्याकरीता जिल्हाधिका-यांकडे प्रस्ताव प्रपत्र (इ) मधील प्रमाणपत्रासह पाठवावा. जिल्हाधिका-यांनी असा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावात अंतर्भुत विशेष दुरुस्तीची कामे टंचाई आराखडयात समाविष्ट असल्याची खात्री करुन त्या कामांसाठी जिल्हा परिषदेच्या स्तरावर निधी उपलब्ध करुन देणे शक्य नाही, याची आधी पडताळणी करावी व त्यांनंतर आवश्यकतेनुसार योजनेतर निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना वितरीत करावा. टंचाई कृती आराखडयात समाविष्ट गावांत/वाडयात विंधण विहिरींच्या विशेष दुरुस्तीसाठी जिल्हाधिका-यांनी या विभागाकडून योजनेतर निधी मिळविण्यासाठी **निधी मागणी प्रपत्र -II** माहिती शासनास सदर करावी.

## (४) विंधण विहिरी :-

(i) टंचाई कृती आराखडयात समाविष्ट ज्या गावांत/वाडयात पाणीपुरवठा करण्याकरीता उपयुक्त योजना म्हणून प्रपत्र (अ) व (ब) मध्ये विंधण विहिरी घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल, अशा गावात/वाडयांत टंचाई कालावधीत विंधण विहिरीचा कार्यक्रम खालील निकषांप्रमाणे राबविण्यात यावा:-

(अ) गावांत शेवटच्या जनगणनेनुसार २०० लोकसंख्येमागे १ विंधण विहिर अनुज्ञेय राहील. या तत्वास अनुसरुन गावाच्या लोकसंख्येचा आणि पूर्वी घेतलेल्या आणि सद्यस्थितीत जिवंत विंधण विहिरींच्या संख्येचा विचार करुन नवीन विंधण विहिरी मंजूर करण्याबाबत विचार करण्यात यावा.

(ब) वाडयांची लोकसंख्या शेवटच्या जनगणनेनुसार किमान ५० असल्यास, १ विंधण विहिरी अनुज्ञेय राहील मात्र-

- सदर वाडीच्या ०.५ कि.मी. अंतराच्या परिसरात कोणताही पिण्याच्या पाण्याचा सार्वजनिक उद्‌भव असू नये.
- सदर वाडी कायम स्वरुपाची असून तिचा समावेश शेवटच्या जनगणनेमध्ये वाडी म्हणून असावा. (जनगणनेच्या पुस्तिकेत वाडीचा निर्देश नसल्यास, जिल्हाधिका-यांनी सदर वाडी कायमस्वरुपी आहे किंवा ती शेवटच्या जनगणनेनंतर कायम स्वरुपी अस्तित्वात आली आहे असे प्रमाणित करणे आवश्यक राहील.)
- मोठया खातेदाराच्या खाजगी वस्त्यांसाठी विंधण विहिरी घेण्यात येऊ नयेत.

(ii) टंचाई कृती आराखडयात समाविष्ट गावांत/वाडयात या विभागाकडून उपलब्ध होणा-या योजनेतर अनुदानातून विंधण विहिर मंजूर करण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना राहतील. टंचाई कृती आराखडयात समाविष्ट गावांत/वाडयांत टंचाई निवारणार्थ विंधण विहिरी मंजूर करण्यापूर्वी सोबत जोडलेल्या प्रपत्र (ब) मध्ये सहाय्यक भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी क्षेत्रिय तपासणीअंती संबधित गावे/वाडयांसाठी किमान खर्चाची व तांत्रिक दृष्टया शक्य उपाययोजना म्हणून विंधण विहिरींची शिफारस योग्य रित्या केली आहे याची खात्री जिल्हाधिका-यांनी संबधित उप विभागीय अधिकारी (किंवा तत्सम महसूल खात्याचा जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी) यांच्या मार्फत न चुकता करावयाचे आहे. तद्‌नंतरच

जिल्हाधिकारी यांना संबधित गावांत/वाडयांत वर नमूद केलेल्या निकषांचा विचार करुन विंधण विहिरी घेण्याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे.

(iii) टंचाई कृती आराखडयातील ज्या गावांत/वाडयात वरिल प्रमाणे विंधण विहिरी घेण्यास जिल्हाधिका-यांनी मान्यता दिलेली असेल अशा गावांपैकी/वाडयांपैकी जी गावे/वाडया, राजीव गांधी पेयजल अभियानांतर्गत सर्वेक्षणानुसार व शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांकः ग्रापापु-१०९३/सीआर-६८७/३९-अ, दिनांक ३० जून १९९३ अन्वये समस्याग्रस्त गावांच्या/वाडयांच्या ठरविलेल्या अग्रक्रमाप्रमाणे, उच्च प्राथम्यक्रम असलेल्या वर्गीकरणात मोडतात अशा किती गावांत/वाडयांत, नियमित ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत जिल्हयांत उपलब्ध असलेल्या योजनांतर्गत तरतुदीतून किंवा संबधित मतदार संघातील आमदारांच्या सहमतीने स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत तरतुदीतून, विंधण विहिरी घेता येतील हे जिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्यांशी सल्लामसलत करुन ठरवावे व फक्त उरलेल्या विंधण विहिरींसाठी सोबतच्या **निधी मागणी प्रपत्र -III** मध्ये शासनाकडून योजनेतर तरतुदीची मागणी करावी.

(iv) प्रत्येक जिल्हयांना आवश्यकतेनुसार विंधण यंत्रे पुरविण्याची व्यवस्था, संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांच्या कडून करण्यात येईल.

**(५) तात्पुरत्या पूरक नळ योजना :-**

(i) टंचाई कृती आराखडयात समाविष्ट असलेल्या गावांत/वाडयांत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न खाजगी विहीर अधिग्रहीत करुन/विहिरींचा गाळ काढून/विहिर खोल करुन/बुडक्या घेऊन/विंधण विहिरी घेऊन/नळ योजनेची विशेष दुरुस्ती करुन किंवा विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करुन सुटत नसेल आणि गावांतील/वाडयांतील अस्तित्वात असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेचे उद्‌भव कमी झालेले/आटले असल्यामुळे तेथे पाणी टंचाई भासत असेल तर तेथे तात्पुरत्या पूरक नळ योजना घेण्याबाबत विचार करण्यात यावा. मात्र असे करतांना प्रस्तावित तात्पुरत्या पूरक नळ योजनांवरील संभाव्य खर्च सदर गावांत/वाडयात टँकरने पाणी पुरवठा करावयाचा झाल्यास,त्यावरील होणा-या संबंधित संभाव्य खर्चापेक्षा कमी असेल तरच तेथे तात्पुरत्या पूरक नळ योजना घेण्यात याव्यात.

(ii) तात्पुरत्या पूरक नळ योजनांना मंजूरी देण्याकरीता अधिकार खालीलप्रमाणे राहतील :-

अ) अंदाजित किंमत रुपये ५ लाखांपर्यंत - जिल्हाधिकारी.

ब) अंदाजित किंमत रुपये ५ लाखापेक्षा जास्त - विभागीय आयुक्त.

(iii) तात्पुरत्या पुरक योजना मंजूर करतांना खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे हे पाहणे मंजूरी अधिका-यांवर बंधनकारक राहील: -

अ) कार्यान्वित असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनेचा उद्‌भव कमी पडत असेल अथवा पूर्ण आटला तरच तात्पुरती पूरक पाणी पुरवठा योजना हाती घेण्यात यावी, मात्र तात्पुरत्या पुरक पाणी पुरवठा योजनेसाठी प्रस्तावित नवीन उद्‌भव कार्यान्वित असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेपासून २ कि.मी. च्या आत असावा.

ब) पूरक उद्‌भव शक्यतो शासकिय घेण्यात यावा, शासकिय उद्‌भव नसल्यासच याकरिता खाजगी विहिरी अधिग्रहीत करण्यात याव्यात.

क) टँकर/बैलगाडीद्वारे पाणी पुरवठा करण्यापेक्षा तात्पुरती पूरक योजना कमी खर्चाची असेल तरच ती घेण्यात यावी.

ड) मूळ क्रियान्वित नळ पाणी पुरवठा योजना स्थानिक स्तर असल्यास, अथवा राज्यस्तर असून हस्तांतरीत असल्यास त्यासाठी तात्पुरत्या पूरक नळ योजना घेण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत करण्यात

३९८

यावी. अहस्तांतरीत राज्यस्तर नळ पाणी पुरवठा योजनांच्या संदर्भातील तात्पुरत्या पूरक नळ योजना घेण्याची कार्यवाही संबधित परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभागाने करावी.

इ) अंदाजपत्रकीय किंमत कमी करण्याच्या दृष्टीने तात्पुरत्या नळ योजना जी यंत्रणा राबविणार असेल त्या यंत्रणेकडे उपलब्ध असलेल्या जुन्या वा वापरण्यास योग्य असलेली पाईप व पंपिग मशिनरी उपयोगात आणावी. तसेच नवीन उद्भव शक्यतो जेथे इलेक्ट्रिक लाईट उपलब्ध आहेत तेथे घ्यावा जेणेकरुन, विजेच्या खर्चात बचत होऊ शकेल.

ई) पावसाळा सुरु झाल्यानंतर पाईप/पपिंग मशिनरी काढून घ्यावी, तसेच संबधित कार्यालयात तशी नोंद घेण्यात यावी.

(iv) सर्वसाधारणपणे रु.५ लाखांपेक्षा जास्त खर्चाच्या तात्पुरत्या पूरक नळ योजना हाती घेण्याची गरज पडू नये असे शासनास वाटते. कारण की, त्यापेक्षा अधिक किंमतीची तात्पुरती पूरक नळ योजना घ्यावयाची असल्यास, जवळ जवळ प्रत्येक प्रकरणी अशा योजनेपेक्षा संबंधित भागात टँकर/बैलगाडीद्वारे पाणीपुरवठा करणे कमी खर्चाचे राहील. अर्थात रु.५ लाखापेक्षा जास्त खर्चाची पूरक योजना मंजूर करतांना विभागीय आयुक्तांनी विशेष काळजी घ्यावी.

(v) येथे असे स्पष्ट करण्यात येते की, तातडीच्या/तात्पुरत्या नळ पाणी पुरवठा योजना घेण्यावर बंदी असून फक्त वरीलप्रमाणे तात्पुरत्या पूरक नळ योजना टंचाई कालावधी पुरत्या अनुज्ञेय आहेत. अर्थात, तात्पुरत्या नळ योजना फक्त जेथे कार्यान्वित नळ पाणी पुरवठा योजना आहे व ज्याचा मूळ उद्भव आटला आहे किंवा कमी पडत आहे, फक्त त्याच ठिकाणी घेता येईल.

(vi) टंचाई कृती आराखडयात समाविष्ट तात्पुरत्या पुरक नळ योजनांसाठी आवश्यक निधीची मागणी जिल्हयाधिका-यांनी सोबतच्या **निधी मागणी प्रपत्र-(iv)** मध्ये या विभागाकडे करावी.

**(iv)** अ) टंचाई कार्यक्रमांर्गत खालील उपाययोजनांसाठी निधी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागमार्फत, "२२४५-नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी सहाय्य" या लेखाशिर्षखाली उपलब्ध करुन देण्यात येईल.

१) बुडक्या घेणे.
२) विहिरी खोल करणे इ.
३) खाजगी विहिरींचे अधिग्रहण करणे.
४) टँकर/बैलगाडीद्वारे पाणीपुरवठा करणे.

यासाठी लागणा-या निधीची मागणी, हाती घ्यावयाच्या कामांचा सविस्तर तपशिल देऊन जिल्हाधिका-यांना विभागीय आयुक्तांमार्फत करावी.

ब) खालील उपाययोजनांसाठी शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून स्वतंत्र योंजनेतर तरतूद लेखाशीर्ष "२२१५-पाणी पुरवठा व स्वच्छता" खाली जिल्हाधिका-यांना विभागीय आयुक्तांमार्फत स्वतंत्रपणे उपलब्ध करुन देण्यात येईलः-

१) विंधण विहिरी घेणे.
२) नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे.
३) विंधन विहिरींची विशेष दुरुस्ती करणे.
४) तात्पुरत्या पुरक नळ योजना घेणे.

सदरील योजनांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया खालील प्रमाणे राहील.:-

कालावधी निहाय टंचाई कृती आराखडा तयार झाल्यानंतर जिल्हाधिका-यांनी सोबतच्या निधी मागणी प्रपत्र क्रमांक I ते IV मध्ये तपशिलवार माहिती पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडे विभागीय आयुक्तामार्फत पाठवून निधीची मागणी करावी. त्या मागणीचा विचार करुन शासनाकडून विभागीय आयुक्तामार्फत आवश्यक तो योजनेतर निधी जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करुन देयात येईल. मात्र विंधण विहिरींसाठी आवश्यक अनुदान परस्पर संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांच्याकडे सुपूर्द करण्यात येईल.



३९८

**(V)** टंचाई कृती आराखडयात समाविष्ट गावांत/वाडयांत सार्वजनिक उद्‌भव असल्यास पाणीपुरवठा योजनांच्या उद्‌भवात पाणी टिकवून धरण्याच्या दृष्टीने शक्य असेल तेथे जाकेट-वेल्स, ट्रेंच-कम बोअरवेल यासारख्या जलसंवर्धनाच्या अपारंपारिक योजना भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने तातडीने हाती घ्याव्यात. यासाठी लागणारा अतिरिक्त निधी संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांना मागणीनुसार शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येईल. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रण, पुणे यांना एकेका गावांसाठी रुपये २ लाख खर्चाच्या मर्यादेपर्यंत अशा अपांरपारिक उपाययोजना मंजूर करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

**(VI)** ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांचा उद्देश उन्हाळयातील टंचाईच्या कालावधीत जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध करुन द्यावयाचे असल्याने टंचाई कृती आराखडयातील उपाययोजना, जनतेस लाभदायक ठरण्याच्या दृष्टीने वेळीच पुर्ण होणे आवश्यक आहे. त्यामुळे मंजुरी दिलेल्या तथापि दरवर्षी ३० जून पूर्वी पूर्ण न झालेल्या उपाययोजनांची मंजूरी शासनाने विशिष्ट मुदतीचे आदेश दिले नसल्यास व्यपगत होईल.

वरीलप्रमाणे टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेतांना त्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येत असलेल्या निधीचा विनियोग योग्य प्रकारे होत असल्याची व या उपाययोजनांमुळे संबंधित गावांत/वाडयांत खरोखर पाणी मिळत असल्याची दक्षता जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी. याकरिता जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एक किंवा आवश्यकतेनुसार अधिक तपासणी पथके गठीत करुन या पथका करवी वेळोवेळी क्षेत्रीय तपासण्या करुन घ्याव्यात. याशिवाय विभागीय आयुक्तांनी देखील विभागीय स्तरावरुन स्वतंत्र तपासणी पथक स्थापन करावे व त्यांच्या माध्यमातून टंचाई कार्यक्रम व्यवस्थितपणे राबविण्यत येत आहे किंवा कसे याची खात्री करावी व निधीचा दुरुपयोग होत असल्याचे आढळून आल्यास, संबधितांवर कारवाई करावी/प्रस्तावित करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**(रु. न. देशमुख)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा. राज्यपालांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
५) प्रधानसचिव वित्त विभाग.
६) सचिव, नियोजन विभाग.
७) सचिव, महसूल व वन विभाग, (मदत कार्य व पुनर्वसन).
८) सचिव आदिवासी विकास विभाग
९) सचिव, (जलसंधारण), ग्राम विकास व जलसंधारण विभाग
१०) सचिव, (ग्रामविकास)ग्रामविकास व जलसंधारण विभाग
११) सर्व विभागीय आयुक्त
१२) सर्व जिल्हाधिकारी
१३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

३९८

१४) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१५) सर्व विभागीय मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१६) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे-३७.
१७) सर्व अधिक्षक अभियंता तथा जिल्हा पाणीपुरवठा अधिकारी.
१८) सर्व कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१९) सर्व कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा ) जिल्हा परिषद.
२०) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे सर्व विभागीय उप संचालक/वरिष्ठ भूवैज्ञानिक.
२१) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक.
२२) सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी.
२३) सर्व तहसीलदार.
२४) महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई,(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा).
२५) महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर,(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा).
२६) सर्व कार्यासने-पाणी पुरवठा स्वच्छता विभाग.
२७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.
२८) निवड नस्ती, कार्यासन क्रमांक-पापु-१४ संग्रहासाठी.



३१८

## प्रपत्र -अ

| तालुका | गाव/वाडीचे नाव | गावाच्या/वाडीच्या १.५ कि.मी. च्या परिसरातील अस्तित्वात असलेली पाणी पुरवठयाची साधने | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रकार | संख्या | उद्भवातून सद्यस्थितीत दरडोई/प्रतिदिनी पाण्याची उपलब्धता | सर्व सार्वजनिक उद्भवातून दरडोई दरदिवशी पाण्याची प्रत्यक्ष उपलब्धता | योजना बंद असल्यास वा अपुरे पाणी पुरवठा करीत असल्यास विशेष दुरुस्ती करुन पुरेसा पाणी पुरवठा करता येईल का (असल्यास त्याचा तपशील द्यावा) |
| | | न.पा.पु.यो.(स्था.स्तर)<br>न.पा.पु.यो. (रा.स्तर)<br>विंधण विहिरी<br>साधी विहीर | | | | |

| खाजगी उद्भव | | | गाव/वाडीच्या १.५ कि.मी. परिसरात खाजगी पाणी पुरवठयाची साधने नसल्यास सर्वात जवळ असलेल्या खाजगी उद्भवाचा तपशील | | | | संबधित गावांत/वाडयात पाणी टंचाई भासण्याची शक्यता असल्यास केव्हा पासून व किती कालावधीसाठी पाणी टंचाई भासेल याचा अंदाज | टंचाई निवारणार्थ प्रस्तावित उपाययोजना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रकार | संख्या | पाण्याच्या उपलब्धते -बाबत अभिप्राय | प्रकार | संख्या | पाण्याच्या उपलब्धतेविषयी अभिप्राय | संबधित गाव/वाडीपासून उद्भवाचे अंतर | | |
| साध्या विहिरी इतर | | | | | | | | |

टिप :- प्रत्येक गावं/वाडीची माहिती स्वतंत्र देण्यात यावी.

329

## प्रपत्र - ब

१) गावाचे वाडीचे नांव :-

तालुका :- जिल्हा लोकसंख्या :-

२) अस्तित्वात असलेले पाण्याचे साधे उद्भव (साध्या विहिरी) -------------

अ) सार्वजनिक विहिरी (सर्व)

१. जागेचे वर्णन --------------

२. खोली --------------

३. पाण्याची स्थिर पातळी --------------

४. विहिरीच्या तळाशी असलेल्या खडकाचा प्रकार --------------

५. ब्लास्टींग करुन विहिर खोल करण्यात आली आहे किंवा करता येईल का, ब्लास्टींगने विहिरीत पाण्याचे प्रमाण वाढेल काय ? तसे असल्यास शिफारस घ्यावी.

६. गाळ काढून विहिरीतून पुरेसे पाणी उपलब्ध होऊ शकेल काय?

ब) हरिजन वस्तीत आणि आदिवासी वस्तीत असलेल्या विहिरींची स्थिती,

३) अस्तित्वात असलेली नळ पाणी पुरवठा योजना :-

अ) नळ योजना सध्या चालू स्थितीत आहे काय? ----------------

ब) नळ पाणी पुरवठा योजनेसाठी पाण्याचा उगम काय? ----------------

क) उद्भवाचे स्थळाजवळ नाला/पाझर तलाव इ.चा फायदा आहे काय? ----------------

ड) पाणी पुरवठा योजनेच्या विहिरीचे पाणी टंचाई कालावधीत पुरेसे पडेल काय? ----------------

i) विहिरीचे तळातील खडकांचा प्रकार ----------------

ii) उद्भव विहिरींची खोली वाढवून/गाळ काढून पुरेसे पाणी प्राप्त होऊ शकेल काय? ----------------

iii) पर्यायी उद्भव (खाजगी/शासकीय) उपलब्ध आहे काय? असल्यास त्यावरुन तात्पुरती पुरक नळयोजना घेऊन अस्तित्वात असलेल्या मूळ नळ योजनेवरुन पुरेसा पाणी पुरवठा करता येईल काय? -----------------

इ) सद्यस्थितीत ग्रामस्थ कोठून पाणी घेतात ----------------

फ) नळ पाणी पुरवठा योजनेचा विद्युतपंप चालू आहे काय? असल्यास, किती तास चालतो.

ग) नळ योजना सध्या नादुरुस्त असल्यास त्यास सत्वर दुरुस्त करुन पुरेसे पाणी उपलब्ध होऊ शकेल काय ? ----------------

४) खाजगी विहिर :-

अ) गावास बारमाही पाणी टिकणारी व टंचाई कालावधीत सुध्दा पुरेसे पाणी देणारी खाजगी विहिर अस्तित्वात आहे काय?

ब) असल्यास, त्यास अधिग्रहीत करुन पुरेसे पाणी मिळू शकेल काय?



323

५) अस्तित्वात असलेल्या सर्व विंधण विहिरी वरील हातपंप किंवा विद्युतपंप यांची स्वतः पाहिल्यानुसार परिस्थिती.

अ) सध्या अस्तित्वात असलेल्या विंधण विहिरीची संख्या ----------------

ब) त्यापैकी चालू विंधण विहिरींची संख्या व प्रत्येकाची ताशी क्षमता ----------------

क) नादुरुस्त विंधण विहिरी सत्वर दुरुस्त करता येईल काय? ----------------

ड) पंप चालू असतांना कनेक्टींग रॉडचा आवाज होतो का? ----------------

इ) विंधण विहिरींची पाहणी केली त्यावेळी पाण्याची पातळी ----------------

फ) पाण्याची स्थिर पातळी. ----------------

म) हातपंपासाठी किंवा विद्युतपंपासाठी दुरुस्ती आवश्यक ----------------

न) नादुरुस्त विंधण विहिरींची दुरुस्ती करुन संभाव्य टंचाईस तोंड देता येईल काय?

६) खाजगी विहिरी :-

अ) गावास बारमाही पाणी टिकवणारी व टंचाई कालावधीत सुध्दा पुरेसे पाणी देणारी खाजगी विहिर अस्तित्वात आहे काय?

ब) असल्यास, त्यास अधिग्रहित करुन पुरेसे पाणी मिळू शकेल काय?

७) अस्तित्वात असलेल्या सर्व विंधण विहिरी वरिल हातपंप किंवा विद्युतपंपं यांची स्वतः पाहिल्यानुसार परिस्थिती.

अ) सध्या अस्तित्वात असलेल्या विंधण विहिरींची संख्या ----------------

ब) त्यापैकी चालू विंधण विहिरींची संख्या व प्रत्येकाची ताशी क्षमता ----------------

क) नादुरुस्त विंधण विहिरी सत्वर दुरुस्त करता येईल काय ? ----------------

ड) पंप चालू असताना कनेक्टींग रॉडचा आवाज होता का? ----------------

इ) विंधण विहिरींची पाहणी केली त्यावेळी पाण्याची पातळी ----------------

फ) पाण्याची स्थिर पातळी ----------------

म) हात पंपासाठी किंवा विद्युतपंपासाठी दुरुस्ती आवश्यक असल्यास त्याचा तपशील ----------------

(उदा. वॉशर जाम झाले आहे काय? जी. आय.पाईप/रॉडलाईल व्यवस्थित आहे का/पंप चालू असताना कनेक्टींग रॉडचा आवाज होतो का इत्यादी)

न) नादुरुस्त विंधणविहिरींची दुरुस्ती करुन संभाव्य टंचाईस तोंड देता येईल काय? ----------------

६) अ) संबधित गावात/वाडयात सध्या प्रगतीपथावरील नळ पाणी पुरवठा योजना/साध्या विहिरी आहेत काय? (असल्यास त्याचा तपशील व योजना पूर्ण होण्याचा संभाव्य कालावधी )

ब) गावात/वाडयात पाणी टंचाई भासण्यापूर्वी सदर प्रगतीपथावरील योजना पूर्ण करणे शक्य आहे काय ----------------

328

## शिफारस

उपरोक्त अस्तित्वात असलेल्या व प्रगतीपथावरील पिण्याच्या पाण्याच्या योजनांची प्रत्यक्ष तपासणी केली असता उपलब्ध पाणी पुरवठा साधनातून (नळ पाणी पुरवठा योजनांद्वारा/विहिरींद्वारे/ हात पंपाद्वारे) होत असलेल्या पाण्याचा पुरवठा गावांच्या/वाडीच्या लोकसंख्येला पुरेसा वाटतो/वाटत नाही त्यामुळे त्या गावास/वस्तीस टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेण्याची गरज आहे/नाही. (*)

गावातील/वाडीतील पाणी पुरवठा साधनांच्या सद्यस्थितीचा व तोंड द्यावयाच्या टंचाई कालावधीचा विचार करता संभाव्य टंचाई निवारक उपाय योजनांपैकी तेथे -------------------------------------- घेणे ही किमान खर्चाची उपाययोजना राहील.

दिंनाक :-

सहाय्यक भूवैज्ञानिक
भूजल सर्वेक्षण अणि विकास यंत्रणा
जिल्हा :-

सहाय्यक भूवैज्ञानिकांनी वरील प्रकारे केलेल्या शिफारशींशी मी सहमत आहे.

दिंनाक :-

(१) तहसीलदार, तालुका

(२) गट विकास अधिकारी,
पंचायत समिती

(टिप :- (*) टंचाई निवारणार्थ उपाययोजनांची गरज नसल्यास पुढचा मजकूर खोडावा)



324

**प्रपत्र -क**

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यांत येते की, मौजे------------------------------,ता---------जिल्हा------------- येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या विशेष दुरुस्तीचे काम टंचाई कृती आराखडयात समाविष्ट असून सदर काम "जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी" तून घेणे जिल्हा परिषदेला निधी अभावी शक्य नाही. म्हणूनच सदर काम टंचाई कार्यक्रमासाठी जिल्हाधिका-यांकडे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने उपलब्ध केलेल्या स्वतंत्र योजनेतर तरतूदीतून मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद

दिंनाकः-

३२६

**प्रपत्र - ड**

टंचाई कृती आराखडयात समाविष्ट गावांत/वाडयात नळ पाणी पुरवठा योजनांच्या विशेष दुरुस्तीची प्रक्रिया

| अ.क्र. | नळ योजनेचा प्रकार | हस्तांतरीत अहस्तांतरित | ज्या निधीतून विशेष दुरुस्तीची कामे करावयाची आहेत त्याचा तपशील | विशेष दुरुस्ती कामास प्रशासकीय मंजुरी देणारे प्राधिकारी | विशेष दुरुस्तीची कार्यवाही ज्या यंत्रणेद्वारे करावयाची आहे तिचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १) | स्थानिक स्तर | हस्तांतरीत वा अहस्तांतरीत | प्रथमतः<br>जिल्हा देशभाल व दुरुस्ती निधीतून | जिल्हा परिषदेअंतर्गत सक्षम अधिकारी | जिल्हा परिषद |
| | | | नंतर :-<br>पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून उपलब्ध होणा-या योजनेतर अनुदानातून | -जिल्हाधिकारी<br>(रु. ५ लाखापर्यंत)<br>-विभागीय आयुक्त<br>(रु. ५ लाखाचे वर) | जिल्हा परिषद |
| २) | राज्य स्तर | हस्तांतरित | प्रथमतः<br>जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून | जिल्हा परिषदेअंतर्गत सक्षम अधिकारी | जिल्हा परिषद |
| | | | नंतर :-<br>पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून उपलब्ध होणा-या योजनेतर अनुदानातून | -जिल्हाधिकारी<br>(रु. ५ लाखापर्यंत)<br>-विभागीय आयुक्त<br>(रु. ५ लाखाचे वर) | जिल्हा परिषद |

328

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| | | अहस्तांतरित (मात्र पुर्ण योजना) | प्रथमतः<br>जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून | जिल्हा परिषदेअंतर्गत सक्षम अधिकारी | संबधित महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग |
| | | | नंतर :-<br>पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून उपलब्ध होणा-या योजनेतर अनुदानातून | -जिल्हाधिकारी (रु. ५ लाखापर्यंत)<br>- विभागीय आयुक्त (रु. ५ लाखांचे वर) | संबधित महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग |
| | | अहस्तांतरित (मात्र अपुर्ण योजना ) | पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून उपलब्ध होणा-या योजनेतर अनुदानात | -जिल्हाधिकारी (रु. ५ लाखापर्यंत)<br>- विभागीय आयुक्त (रु. ५ लाखांचे वर) | संबधित महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग |

३२९

## प्रपत्र - ई

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, मौजे---------------------------ता.---------------------जिल्हा-----------

येथील विंधण विहिरींच्या विशेष दुरुस्तीचे काम टंचाईकृती आराखडयात समाविष्ट असून सदर काम जिल्हा "देखभाल व दुरुस्ती निधी/जिल्हा परिषदेच्या स्वतःच्या निधी" तून घेणे जिल्हा परिषदेला निधी अभावी शक्य नाही. म्हणूनच सदर काम टंचाई कार्यक्रमासाठी जिल्हाधिका-यांकडे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने उपलब्ध केलेल्या स्वतंत्र योजनेतर तरतूदीतून मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद

दिनांक

**टंचाई कृती आराखडा (कालावधी----------------)**

**(आर्थिक वर्ष निहाय)**

**निधी मागणी प्रपत्र - I (नळ योजनांची विशेष दुरुस्ती)**

जिल्हा

| टंचाई कृती आराखडयांमधील संभाव्य पाणी टंचाईची एकूण गांवे/वाडया | | कृती आराखडयात समाविष्ट संभाव्य टंचाईच्या गावांपैकी /वाडयापैकी ज्या ठिकाणी नळ योजनांची विशेष दुरुस्ती प्रस्तावित आहे अशा गावांची/वाडयांची संख्या | | एकूण विशेष दुरुस्ती करावयाच्या नळ योजनांची संख्या | | | अंदाजपत्रकीय किंमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गावे | वाडया | गावे | वाडया | राज्यस्तर | स्थानिकस्तर | एकूण | राज्यस्तर | स्थानिकस्तर | एकूण |
| | | | | | | | | | |

जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून घेता येतील अशी नळ योजनांची विशेषं दुरुस्तीची कामे

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीसाठी आवश्यक योजनेतर तरतूदी

| संख्या | | | अदांजित किंमत | | | राज्यस्तर योजनांसाठी | स्थानिकस्तर योजनासाठी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राज्यस्तर | स्थानिकस्तर | एकूण | राज्यस्तर | स्थानिकस्तर | एकूण | | | |

332

**टंचाईकृती आराखडा (कालावधी :------------)**

**(आर्थिक वर्ष निहाय)**

**निधी मागणी प्रपत्र -II (विंधण विहिरीची विशेष दुरुस्ती)**

जिल्हा :-

| टंचाई कृती आराखडयामधील संभाव्य पाणी टंचाईची एकूण गांवे/वाडया | | कृती आराखडयात समाविष्ट संभाव्य टंचाईच्या गावांपैकी/वाडयापैकी ज्या ठिकाणी विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती प्रस्तावित आहे अशा गावांची/वाडयांची संख्या | | एकूण विशेष दुरुस्ती करावयाच्या विंधण विहिरींची संख्या | अंदाजपत्रकीय किंमत |
|---|---|---|---|---|---|
| गावे | वाडया | गावे | वाडया | | |
| | | | | | |

| जिल्हा परिषदेस त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नातून/जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून हाती घेता येतील अशी विंधण विहीरींची विशेष दुरुस्तींची कामे | | पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून विंधण विहिरींच्या विशेष दुरुस्तीसाठी आवश्यक योजनेतर तरतूद |
|---|---|---|
| संख्या | अंदाजित किंमत | |
| | | |

333

**टंचाई कृती आराखडा (कालावधी ---------)**
**(आर्थिक वर्ष निहाय)**
**निधी मागणी प्रपत्र -III (विंधण विहिरी कार्यक्रम)**

जिल्हा :-

| टंचाई कृती आराखडयात समाविष्ट संभाव्य टंचाईग्रस्त असलेल्या गावांची /वाडयाची एकूण संख्या | | टंचाई कृती आराखडयात समाविष्ट संभाव्य टंचाईच्या गावांपैकी/वाडयापैकी नवीन विंधण विहिरीद्वारा टंचाई निवारण होणा-या गावांची/वाडयाची संख्या | | टंचाई कृती आराखडयात प्रस्तावित नवीन विंधण विहिरी. | |
|---|---|---|---|---|---|
| गावे | वाडया | गावे | वाडय | संख्या | किंमत |
| | | | | | |

| सदर प्रस्तावित विंधण विहिरींपैकी जिल्हयास ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी उपलब्ध योजनांतर्गत तरतूदीतून/स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत तरतूदीतून घेता येणे शक्य असलेल्या विंधण विहिरींचा तपशील. | | | | | | पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून उपलब्ध होणा-या तरतूदीतून घ्यावयाच्या विंधण विहिरी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| किमान गरजा कार्यक्रम | | वर्धितवेग पाणी पुरवठा कार्यक्रम | | स्थानिक विकास कार्यक्रम | | संख्या | आवश्यक अनुदान |
| संख्या | किंमत | संख्या | किंमत | संख्या | किंमत | | |

338

**टंचाई कृती आराखडा (कालावधी ---------)**

**(आर्थिक वर्ष निहाय)**

**निधी मागणी प्रपत्र -IV (तात्पुरत्या पूरक नळ योजना)**

जिल्हा :-

| टंचाई कृती आराखडयांत समाविष्ट संभाव्य टंचाईग्रस्त असलेल्या गावांची/वाडयांची एकूण संख्या | | टंचाई कृती आराखडयात समाविष्ट संभाव्य टंचाईच्या गावांपैकी/वाडयांपैकी तात्पुरत्या पूरक नळ योजनांद्वारा टंचाई निवारण होणा-या गांवाची /वाडयांची संख्या | | टंचाई कृती आराखडयात प्रस्तावित तात्पुरत्या पूरक नळ योजना व त्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून आवश्यक योजनेतर अनुदान | |
|---|---|---|---|---|---|
| गावे | वाडया | गावे | वाडया | संख्या | किंमत |
| | | | | | |

334

**पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी हाती घ्यावयाच्या आकस्मिक उपाययोजना**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांकःटंचाई-३०९९/प्र.क्र. १३ / पापु-१४**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांकः- १२ एप्रिल, १९९९.**

**संदर्भ :- शासन निर्णय समक्रमांक दि. १ फेब्रुवारी १९९९.**

**शासन शुध्दीप्रत्रकः-**

संदर्भाधीन शासन निर्णयातील परिच्छेद २ मधील अ.क्र.४ येथील " नदीच्या पात्रात बुडकी घेणे " या उपाययोजनेला मंजूरी देण्याची जिल्हाधिका-यांची वित्तीय मर्यादा "रु. १०,०००/- पर्यंत" अशी दर्शविली आहे. सदर वित्तीय मर्यादा "रु. १०००/- पर्यंत" अशी वाचावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**(रु. न. देशमुख)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) विभागीय आयुक्त, (सर्व)
२) सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
३) संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.
४) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)
५) जिल्हाधिकारी, (सर्व ).
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व).
७) जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधर्क्षिक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व).
८) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व ).
९) विभागीय उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व).
१०) जिल्हा वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व).
११) कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा)जिल्हा परिषद, (सर्व).
१२) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (मुंबई लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता).
१३) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (नागपुर लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता).
१४)जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
१५)मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा, मुंबई.
१६) वित्त विभाग, मंत्रालय मुंबई.
१७)महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८)ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षिय अधिकारी व कार्यासन अधिकारी.
२०)पापु-१४ संग्रहासाठी